आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५वाजता

२४ ऑगस्ट २०२४ - शनिवार

## ठळक बातम्या

- केंद्रीय मंत्रीमंडळाची UPS अर्थात एकात्मिक निवृत्तीवेतन योजनेला मंजुरी, मूळ वेतनाच्या किमान ५० टक्के निवृत्तीवेतन देण्याची ग्वाही

- आकाशवाणीवर उद्या सकाळी ११ वाजता ‘मन की बात’मधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा देशवासियांशी संवाद

- प्रधानमंत्री उद्या जळगावमध्ये लाखो लखपती दीदींशी संवाद साधणार, बचत गटांच्या कर्ज वितरणालाही करणार सुरुवात

**आणि**

- मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलवादी समस्येतून मुक्त करण्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं आज UPS अर्थात एकात्मिक निवृत्तीवेतन योजनेला मंजुरी दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज ही बैठक झाली. NPS अर्थात नवीन निवृत्ती वेतन योजनेच्या अंतर्गत असलेल्या केंद्र सरकारच्या २३ लाख अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना याचा लाभ होईल. राज्य सरकारचे अधिकारी-कर्मचारी यात सहभागी झाले तर ही संख्या ९० लाखांनी वाढतील, अशी माहिती माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वार्ताहर परिषदेत दिली.

या योजनेअंतर्गत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शेवटच्या १२ महिन्यांच्या वेतनाच्या निम्मे वेतनाइतकी रक्कम निवृत्तीवेतन म्हणून मिळेल. मात्र यासाठी त्यांना किमान २५ वर्ष सेवेत रहावे लागेल. १० वर्ष ते २५ वर्ष दरम्यान सेवा केलेल्यांना त्या प्रमाणात निवृत्तीवेतन मिळेल. किमान १० वर्ष सेवा केलेल्यांना किमान १० हजार रुपये निवृत्तीवेतन दिले जाईल. या सर्व रकमेवर महागाई भत्ताही दिला जाईल, असं वैष्णव म्हणाले. अधिकारी-कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला लगेच मूळ वेतनाच्या ६० टक्के रक्कम निवृत्ती वेतन म्हणून दिले जातील. याव्यतिरीक्त निवृत्त होताना अधिकारी-कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युइटी शिवाय ठराविक रक्कम दिली जाईल. ही रक्कम ६ महिन्यांच्या पूर्ण केलेल्या सेवेसाठी मूळ वेतन अधिक महागाई भत्त्याच्या एक दशांश इतकी असेल. त्यामुळं ३० वर्ष सेवा केलेल्यांना सुमारे ६ महिन्याचे मूळ वेतन आणि महागाई भत्त्याची रक्कम मिळेल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

पुढच्यावर्षीच्या एप्रिलपासून ही योजना लागू होईल. तोपर्यंत सर्वांना ही योजना स्वीकारण्याचा पर्याय दिला जाईल आणि इतर प्रक्रिया पूर्ण केल्या जातील. सध्या NPS अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या खात्यात सरकार १४ टक्के रक्कम जमा करते. आता ही रक्कम साडे १८ टक्के होणार आहे. NPS अंतर्गत निवृत्त झालेल्या सर्वांनाही या योजनेचे लाभ मिळणार आहेत.

**<><><><><>**

आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी अकरा वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११३ वा भाग आहे.

हा कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि दूरदर्शन वाहिनीवरून प्रसारित होईल. newsonair.gov.in हे संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ऍपवरही हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. आकाशवाणी आणि दूरदर्शनचे यूट्यूब चॅनल, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनलवर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. रात्री ८ वाजता या कार्यक्रमाचं मराठी भाषांतर ऐकता येईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या जळगावमध्ये लखपती दिदी संमेलनात सहभागी होणार आहेत. देशभरातल्या 11 लाख नव्या लखपती दीदींना प्रमाणपत्र देऊन प्रधानमंत्री त्यांचा गौरव करणार आहेत. तसंच अडीच हजार कोटी रुपयांच्या फिरत्या निधीच्या वितरणाची सुरुवात प्रधानमंत्री करणार आहेत. देशभरातल्या सव्वा चार लाखांहून अधिक बचत गटातल्या सुमारे ४८ लाख महिलांना याचा लाभ होणार आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पाच हजार कोटी रुपयांच्या बँक कर्जाचं वाटप होईल. याचा लाभ २ लाख ३५ हजार बचत गटातल्या २५ लाखांहून अधिक सदस्यांना होईल.

देशातल्या सर्वाधिक १६ लाख लखपती दीदी महाराष्ट्रात आहेत. या कार्यक्रमात जवळपास दीड लाख लखपती दीदी सहभागी होणार असल्याची माहिती मंत्री गिरीष महाजन यांनी आज जळगावमध्ये दिली. प्रधानमंत्री नरेंद्र

मोदी त्यांच्याशी चर्चा करतील, या महिला लखपती कशा झाल्या, त्यांना काही समस्या आहेत का हे प्रधानमंत्री त्यांच्याकडून जाणून घेतील.

त्यानंतर संध्याकाळी राजस्थानात जोधपुर मध्ये राजस्थान उच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त होणार असलेल्या समारंभाला प्रधानमंत्री संबोधित करणार आहेत.

<><><><><>

नेपाळमध्ये झालेल्या अपघातात मरण पावलेल्यांच्या कुटुंबांना दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये महाराष्ट्रातल्या २५ जणांचा समावेश असून त्यांचे मृतदेह भारतीय हवाई दलाच्या विमानाने भारतात आणण्यात येणार आहेत. हे विमान संध्याकाळी जळगाव इथल्या विमानतळावर पोहोचेल अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी दिली. नेपाळमध्ये बस नदीत पडून झालेल्या काल झालेल्या अपघातात २७ जणांचा मृत्यू झाला होता.

या अपघातात जखमी झालेल्या १५-१६ लोकांवर सध्या तिथेच उपचार सुरू आहे. २-३ दिवसांनी त्यांना मुंबईला हलवलं जाईल, अशी माहिती मंत्री गिरीष महाजन यांनी दिली.

<><><><><>

येत्या मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलवादी समस्येतुन संपूर्ण मुक्त केलं जाईल, असं प्रतिपादन केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी केलं आहे. ते आज छत्तीसगढ़ची राजधानी रायपुर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. माओवाद्यांविरुद्धची लढाई आता अंतिम टप्प्यात असल्याचं त्यांनी

सांगितलं. आत्मसमर्पण करायला इच्छुक असलेल्या माओवाद्यांसाठी छत्तीसगढ़ सरकार लवकरच एक नवीन आत्मसमर्पण धोरण राबवणार असल्याची माहिती त्यांनी दिली. दहशतवादाचा प्रभाव असलेल्या सर्व क्षेत्रात कायदा आणि सुव्यवस्था स्थापन करण्याबरोबरच त्या क्षेत्रात विकासाचा वेग वाढवण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. या बैठकीला छत्तीसगड, झारखंड, ओदिशा, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि महाराष्ट्राचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक तसंच केंद्र आणि राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातल्या शेवटच्या बहिणीचा अर्ज सादर होईपर्यंत योजनेसाठी नोंदणी सुरूच राहील, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे. यवतमाळ इथं लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती मेळाव्यात ते बोलत होते. या योजनेसाठी आतापर्यंत एक कोटी ४० लाख महिलांनी नोंदणी केली असून एक कोटी सात लाख लाभार्थ्यांच्या खात्यात योजनेची रक्कम जमा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पुढच्या महिन्यात अर्ज सादर करणाऱ्यांनाही ३ महिन्याचे पैसे देणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना २५० जागा लढवणार असल्याचं पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केलं आहे. नागपुरातील रवि भवन इथं आज, ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी जनता आपल्यासोबत असून मनसेला निवडणुकीत चांगले यश मिळेल असा

दावा ठाकरे यांनी केला. विधानसभा निवडणुकीसाठीची आपली धोरणं त्यांनी स्पष्ट केली.

राज्य सरकारनं सुरू केलेली लाडकी बहिण योजना औटघटकेची ठरेल. राज्याच्या तिजोरीत पैसा नसल्याने ही योजना २ महिन्यात गुंडाळली जाईल असं भाकित त्यांनी वर्तवलं.

<><><><>

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी सरकारचा निषेध करण्यासाठी आज महाविकास आघाडीच्या घटकपक्षांतर्फे राज्यात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आलं. कायदा सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरुन राज्य सरकारनं राजीनामा द्यावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आलं. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्यानं महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्ह्यातल्या संगमनेरमध्ये आंदोलनादरम्यान केली.

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भाजपानं आज राज्यात जागर जाणिवेचा हे अभियान राबवलं. या प्रकरणातल्या आरोपींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी, यात कुणीही राजकारण करू नये, असं भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. इतर ठिकाणी झालेल्या आंदोलनात पक्षाचे विविध नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

<><><><>

भारताच्या किशोर कुमारनं आज तराफा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यानं येत्या २०२६ आशियाई स्पर्धांमध्ये भारताचा प्रथमच तराफा

खेळासाठी प्रवेश निश्चित झाला आहे. जपानच्या ऐची-नागोया इथं ही स्पर्धा होणार आहे. किशोर कुमारनं आशियाई सर्फिंग अजिंक्यपद २०२४ स्पर्धेत १८ वर्षांखालील गटात उपांत्य फेरीत अत्यंत चांगली कामगिरी केल्यानं भारतीय पुरुष संघाचा प्रवेश २०२६ स्पर्धेसाठी निश्चित झाला असून भारतीय महिला संघही या स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

**<><><><>**

चीन मध्ये हुलूदाओ शहरातल्या लिओनिंग प्रांतात सुरू असणाऱ्या मुसळधार पावसामुळे ११ जणांचा मृत्यू झाला असून १४ जणं बेपत्ता झाले. पावसामुळे घरं, रस्ते, पिकं, वीज वाहिन्या आणि दळणवळणाच्या साधनांचं प्रचंड नुकसान झालं. शहरातल्या १ लाख ८८ हजारांहून अधिक नागरिकांना याचा फटका बसला आहे.

**<><><><>**

चीनच्या जिआंगसू परगण्यात एका व्यावसायिक दुकानात काल रात्री लागलेल्या आगीत सहा जणांचा मृत्यू झाला. या आगीत चार जण जागीच ठार झाले तर जखमी झालेले इतर दोनजण उपचार सुरु असताना मृत्युमुखी पडल्याची माहिती बचाव पथकानं दिली.

**<><><><>**

कोलकात्यात राधागोविंद कार रुग्णालयातल्या बलात्कार आणि हत्या प्रकरणी विशेष तपास पथकानं तपासाची कागदपत्र केंद्रीय अन्वेषण संस्थेकडे सुपूर्द केली असून सीबीआय ७ जणांची पॉलीग्राफ चाचणी करणार आहे. वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी प्राचार्य संदीप घोष यांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

देशभरात येत्या २९ ऑगस्टला राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्याचं आवाहन युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी केलं आहे भारताला सुदृढ राष्ट्र बनवण्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नाचा पुनरुच्चार मांडवीय यांनी यावेळी केला.

**//<><><><><>//**